| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.१२११/२०१७ |
| सरकार -वि-आनंद |
| निशाणी क्र.३९ |

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | सचिन विनोदराव इझनकर, |
| **वय** | : | ४२ वर्षे, |
| **धंदा** | : | खाजगी नोकरी, |
| **राहणार** | : | शाहूनगर, मानेवाडा-बेसा रोड, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत**

मी मागील १५ वर्षांपासून राजेश फटींग यांच्या सलुनमध्ये काम करतो. सलून व्यतिरिक्त राजेश फटींग रिक्षा चालवतात. प्रकाश फटींग हे राजेश फटींग यांचे लहान भाऊ आहे. मी आनंद थुल यांना ओळखत नाही. मला घटनेबाबत काही माहीत नाही. पोलीसांनी कोणत्याही घटनेबाबत माझा जबाब घेतला नाही. आज प्रकाश फटींग कोर्टासमक्ष हजर आहे. हे मला माहीत नाही की, राजेश फटींग यांनी आरोपी प्रकाश फटींग व आनंद थुल यांच्याकडून जीटीपीएलचे केबल कनेक्शन घेतले होते.

**सरकारी अभियोक्तांच्या विनंतीवरुन साक्षीदार पूर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने उलट तपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली. उलटतपास सरकारी अभियोक्तांतर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, राजेश फटींग यांनी केबल कनेक्शन घेतले होते व त्याद्वारे त्यांच्या दुकानात आम्हाला २५० ते ३०० चॅनल्स मोफत बघायला मिळत होते व ते आम्ही नियमीतपणे बघत होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब घेतला

होता व त्यात मी सदर बाब सांगितली होती.  आता मला माझा जबाब दिनांक २५.०६.२०१६ मधील **अधोरेखांकीत भाग -'अ'** वाचून दाखवला, तो खरा नाही, त्यातील मजकूर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदरचा मजकूर पोलीसांनी माझ्या जबाबात का लिहिला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या ओळखीचे असल्यामुळे मी आरोपींना वाचवण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपींतर्फे आरोपी स्वतः**

३.        नाकारला.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE
Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2025.09.02 17:55:42 +0530

**( अनामिका दे. बोस )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक  ०२.०९.२०२५